महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

शुक्रवार ❖ २० डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७५ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024


# विधानसभेत खडाजंगी

## फडणवीसांचे विरोधकांना खडेबोल



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**नागपूरः राज्यपालांच्या अभिभाषणावरील विधानसभेत गुरुवारी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधक आणि काँग्रेसवर जोरदार टीकास्त्र सोडले. ईव्हीएम हटाओ, भारत जोडो यात्रेने देशविरोधी शक्तींच्या पाठीशी उभ्या असलेल्या लोकांना संधी दिल्याचा आरोप फडणवीस यांनी केला. फेक नरेटिव्हवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सुरुवातीला म्हणाले, 'आम्ही लोकसभेनंतर फेक नरेटिव्ह उखडून टाकले. मतांसाठी ज्या काही फेक नरेटिव्ह पसरवल्या जात होत्या त्या उखडून टाकले आहे हे सांगण्यासाठी आज मी इथे आहे.'**

**शरद पवारांवरही निशाणा**

शरद पवार यांच्यावर निशाणा साधताना ते म्हणाले, 'निकाला त्यांचा बाजूने लागला तर सर्व काही ठीक आहे, संविधानाचा विजय आहे. मात्र, विरोधकांच्या बाजूने निकाल आला तर संविधानाचा खून झाला, लोकशाही धोक्यात आहे, असे म्हटले जाते. तेवढीच मते मिळाल्याचे सांगण्यात आले. ही काही पहिलीच वेळ नाही. 'राज्यातील अनेक जागांवर हे घडत आहे. ही काही पहिलीच वेळ नाही. जेव्हा दोघांना समान मते मिळाली, राज्यात अनेक जागांवर असे झाले आहे.

फडणवीस म्हणाले, 'ग़ालिब ताउम्र ये भूल करता रहा,धूल चेहरे पर थी और वो शीशा पोछते रहे..'

त्याचवेळी भारत जोडो यात्रा आणि ईव्हीएम हटाओ यात्रेवर हल्लाबोल करताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर घणाघाती आरोप केले. मुख्यमंत्री म्हणाले, 'ईव्हीएम काढा रॅली काढण्यात आली. यामध्ये मुख्य वक्ते महमूद प्राचा हे होते ज्यांनी न्यायालयात दहशतवाद्यांची वकिली केली होती. निवडणूक जिंकण्यासाठी काय काय नाही केले. महाराष्ट्रात निवडणूकीत वोट जिहादचा नारा देण्यात आला. उलेमा बोर्डाने १७ कलमी मागण्या मांडल्या आणि काँग्रेसने त्यावर मौन बाळगले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत जोडो यात्रेत देशविरोधी शक्तींशी संबंध असल्याचा आरोप केला आणि म्हणाले, 'भारत जोडोमध्ये शहरी नक्षलवादी सहभागी होते. लोक काठमांडूला गेले आणि ईव्हीएमविरोधातील मोहिमेची रूपरेषा ठरली. 'भारत जोडो' अभियानात सहभागी ४० संघटना या शहरी नक्षलवादी फ्रंटल आर्गेनाईजेशन आहे. शहरी नक्षलवाद्यांनी तरुणांमध्ये अराजकता निर्माण करण्याचे काम सुरू केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राज्यघटना मोडून शहरी नक्षलवाद्यांना अराजकता पसरवायची आल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांना सल्ला देत म्हणाले, 'मला तुमच्या देशभक्तीबद्दल मला शंका नाही. पण, निवडणूक जिंकण्यासाठी अनेक युत्त्या केल्या , शहरी नक्षलवादी सतत लोकांच्या खांद्याला शोधत असतात. विरोधकांना माझी विनंती आहे की विरोधकांनी त्यांच्या खांद्याला खांदा देऊ नये.'

### विरोधकांनी जनादेश स्वीकारावा

**फडणवीस यांनी विधानसभेत विरोधकांना ईव्हीएमची कार्यपद्धती आणि इतिहासही जोरदारपणे समजावून सांगितला. फडणवीस यांनी पुन्हा खडाजंगी केली आणि म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने बाजूने निकाल दिला तर सर्व काही ठीक आहे, पण विरोधात निकाल दिला तर विरोध सुरू होतो. विरोधकांनी आता संविधान आणि जनतेचा आदर करत जनादेश स्वीकारावा, असे फडणवीस म्हणाले.**

## संपादकीय

### एकीकडे नाराजी नाट्य, दुसरीकडे भेटींना उधाण!

राज्य विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबर २०२४ रोजी सपन्न झाली, या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले या यशानंतर वाटले महायुतीत सर्व काही अलबेल असावे, मात्र अपेक्षित यश मिळून देखील मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री शपथविधी तब्बल पंधरा दिवसानी पार पडला. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार तोही ऐत्यासिक सोहळा म्हणून थाटा माठात नागपूर मध्ये हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंधेला पंधरा दिवसांनी सपन्न झाला, त्यानंतर झालेले नाराजी नाट्य महायुतीतील आंतर्गत खदखद किती व कशी सुरु आहे. या बाबत उलट सुलट चर्चांना उधाण देणारी ठरत आहे. त्यातच नागपूर मध्ये अधिवेशनाच्या काळात दस्तूरखुद्द उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटी घेत राजकारणात फक्त संपवा संपवी बोलायचं भात, बोलायची कढीच असते असा च मॅसेज प्रसारमाध्यमाना दिला की काय या चर्चा सोबत नागपूर च्या संत्रा नगरीत राज्याच्या राजकारणात भविष्यात पुन्हा भूकंप घडणार तर नाही ना? असा ही मॅसेज या निमित्ताने दिला.

मंत्रिमंडळ विस्तारात स्थान जेष्ठ व अभ्यासू नेते माजी मंत्री व ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ प्रचंड नाराज आहेत.ते नागपूर सोडून नाशिक मध्ये गेले.ते प्रचंड नाराज आहेत नाशिकमध्ये बैठकांचा सिलसिला सुरु आहे. तर शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी मंत्रिपद मिळाले नाहीत म्हणून अधिवेशन सोडून चक्क त्यांनी आपले घर गाठाले आहे. तीच स्थिती महायुतीच्या सर्वात मोठा घटक पक्ष असणाऱ्या भाजपात देखील झालेली आहे. सुधीर मुंगट्टीवार नाराजी झाले आहेत. अनेक आमदार डावळल्याने नाराज आहेत. हे नाराजी नाट्यही चांगलेच उफाळून आले आहे.

महायुतीला मतदारांनी मतांच्या रूपाने भरभरून दिले आहे.या मतदाराच्या अपेक्षा वाढल्या आहेत, सरकारने याकडे लक्ष देणे आता गरजेचे आहे. विधानसभेचे हिवाळी आदिवेशन नागपुरात सुरु आहे. शुक्रवारी ते संपेल ही या अधिवेशनात नाराजी नाट्यच ज्यास्त चर्चीले गेले. मंत्री महोदय कोणतं खात मिळेल या प्रतीक्षेत दिसतं होते तर भविष्यातील राजकीय पेरणीची बेगणी, गाठी भेटीतून सुरु होती.

# संसदेत धक्काबुक्की!

## भाजप खासदार जखमी

**संसदेतील धक्काबुक्कीच्या घटनेनंतर राहुल गांधी यांनी आपली बाजू मांडताना म्हटले की, मी संसदेच्या प्रवेशद्वारातून आत जाण्याचा प्रयत्न करत होतो. त्यावेळी भाजप खासदार मला रोखण्याचा प्रयत्न करत होते. ते मला धमकावत होते, त्यावेळी हा प्रकार घडला. मला संसदेत जाण्याचा अधिकार आहे. भाजप संविधानावर आक्रमण करत आहे, हा मूळ मुद्दा आहे, असे राहुल गांधी यांनी म्हटले.**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

केंद्रीय मंत्री अमित शाह या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या एका वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला होता. यावरुन काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या खासदारांनी रान उठवले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजप खासदारांना काँग्रेसवरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा ठपका ठेवत गुरुवारी संसदेत निषेध आंदोलन केले. हे आंदोलन सुरु असताना काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी आपल्याला धक्काबुक्की केल्याचा गंभीर आरोप भाजपचे खासदार प्रताप चंद्र सारंगी यांनी केला. राहुल गांधी यांनी एका खासदारला धक्का दिला. त्यामुळे तो खासदार माझ्या अंगावर पडला आणि माझ्या डोक्याला जखम झाली, असा दावा प्रताप चंद्र सारंगी यांनी केला.

नव्या संसदेच्या मकर द्वाराच्या परिसरात हा धक्काबुकीचा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. प्रताप चंद्र सारंगी जखमी झाल्यानंतर भाजपच्या काही खासदारांनी मल्लिकार्जून खरगे आणि प्रियांका गांधी यांनाही धक्काबुक्की केल्याचे समजते.



राहुल गांधींनी एक खासदाराला माझ्या अंगावर ढकलले, त्यामुळे मी खाली पडलो आणि जखमी झालो. मी पायऱ्यांवर उभा होतो. त्यावेळी राहुल गांधींनी धक्का दिलेला खासदार माझ्या अंगावर पडला, असा सारंगी यांचा दावा आहे. दरम्यान, प्रताप सारंगी यांना या प्रकारानंतर तातडीने एअर ॲम्ब्युलन्सने रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रताप सारंगी यांच्या डोक्याला जखम झाली आहे. त्यांच्यावर सध्या दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर भाजप खासदार मुकेश राजपूत यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर पीयूष गोयल , धर्मेंद्र प्रधान , शिवराज सिंह चौहान आणि प्रल्हाद जोशी इस्पितळात पोहचले आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात इंडिया आघाडीकडून संसदेत आंदोलन करण्यात आले. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यानंतर इंडिया आघाडी आक्रमक झाली आहे. अमित शहा यांनी माफी मागावी आणि पदाचा राजीनामा द्यावा यासाठी इंडिया आघाडीचे आंदोलन सुरु आहे. या घटनेनंतर इंडिया आघाडीचे खासदारही आक्रमक झाले आहेत. विरोधी पक्षाचे खासदार मकरदवाराच्या भिंतीवर चढले. नवीन संसदेच्या परिसरात पहिल्यांदाच भिंतीवर चढून आंदोलन करत होते.




## उल्हासनगरात ऑनलाइन बांधकाम प्रस्तावांचा मार्ग सुलभ होणार

### महाआयटी कार्यशाळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

**उल्हासनगर :** सुरवातीची ऑफलाईन बांधकाम प्रस्तावाची प्रक्रिया बंद करण्यात आली असून आता ऑनलाइन प्रणाली अमलात आणली गेली आहे. मात्र त्यात तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्याने उल्हासनगर महानगरपालिकेचे आयुक्त विकास ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांच्या पुढाकाराने ऑनलाइन बांधकाम प्रस्तावाचा मार्ग सुकर करण्यासाठी कार्यशाळा तसेच प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात महाआयटी अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. पालिका आयुक्त विकास ढाकणे व सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांनी बांधकाम परवाना प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी ऑनलाइन बांधकाम प्रस्तावाची प्रक्रिया १ ऑगस्टपासून सुरू केली आहे. मात्र त्यात बऱ्याच तांत्रिक अडचणी येत असल्याने प्रस्तावांना अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्याअनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत महाआयटीचे प्रकल्प व्यवस्थापक सचिन देवरे आणि अरीफ शाह आणि सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांनी उपस्थित वास्तुविशारद यांना ही प्रक्रिया ऑफलाईन ऐवजी ऑनलाइन झाली असली तरी प्रक्रिया समान आहे.

पूर्वी कागदोपत्री प्रक्रिया होती तीच आता ऑनलाइन कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करून बांधकाम परवानगीचा मार्ग सुकर करण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला असून उपस्थितांच्या शंकांचे निराकरण करण्यात आले आहे. त्यामुळे ऑनलाइन प्रणालीद्वारे बांधकाम प्रस्ताव मोठ्या प्रमाणात सादर होण्याची शक्यता नाकारता येत नाही असा विश्वास सहायक संचालक नगररचना ललित खोब्रागडे यांनी व्यक्त केला आहे.






# कल्याण तहसील कार्यालयात शेतकऱ्याकडून लाच!

## महसूल साहाय्यकाला अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील रायते येथील एका जमीन खरेदी प्रकरणात जमीन मालक शेतकऱ्याकडून ४० हजार रूपयांची लाच घेताना येथील तहसीलदार कार्यालयातील एका महसूल साहाय्यकाला बुधवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. संतोष महादेव पाटील (४६) असे लाच घेताना पकडलेल्या महसूल साहाय्यकाचे नाव आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक गजानन राठोड, संजय गोवीलकर, पोलीस निरीक्षक रूपाली पोळ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पोलीस निरीक्षक रूपाली पोळ यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यातील तक्रारीत दिलेली माहिती अशी, तक्रारदार शेतकरी यांनी कल्याण तालुक्यातील रायते गावी दहा गुंठे जमीन खरेदी केली आहे. या जमिनीचा सातबारा उतारा आणि फेरफार स्वताच्या नावे नोंद होण्यासाठी तक्रारदार शेतकरी महसूल कार्यालयात प्रयत्नशील होता. सातबारा, फेरफार नोंद होण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जमीन खरेदीदार शेतकऱ्याकडे शेतकरी असल्याचा तहसीलदारांचा दाखला आवश्यक होता. त्याशिवाय ही नोंद होणार नाही असे खरेदीदाराला महसूल विभागाने कळविले होते.

खरेदीदार शेतकऱ्याने या दाखल्यासाठी आपल्या मूळ गावी असलेल्या उत्तरप्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील केराकत तहसीलदारांचा दाखला मिळण्याची मागणी त्या कार्यालयाकडे केली होती. त्याप्रमाणे तो दाखल कल्याण तहसीलदार कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. जमीन खरेदीदार शेतकऱ्याची शेतकरी दाखल्यासह सातबारा सदरी नोंद होण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असा प्रस्ताव रायते तलाठी यांना पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक संतोष पाटील यांनी तक्रारदाराकडे चाळीस हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही आपल्याकडे पैसे मागितले जात असल्याने जमीन खरेदीदार शेतकऱ्याने याप्रकरणी गेल्या शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाकडे तक्रार केली. या तक्रारीप्रमाणे मंगळवारी तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने पंचांसमक्ष पडताळणी केली. या पडताळणीत महसूल साहाय्यक स्वतासाठी २० हजार आणि वरिष्ठांसाठी २० हजार रूपये मागत असल्याचे निष्पन्न झाले.बुधवारी संध्याकाळी लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे शेतकऱ्याने महसूल साहाय्यक पाटील यांना लाचेची रक्कम देण्याचे कबुल केले. कल्याण तहसीलदार कार्यालयातील महसूल साहाय्यक कक्षाच्या पाठीमागील बाजूस तक्रारदार शेतकऱ्याकडून ४० हजार रूपयांची लाच घेताना पथकाने संतोष पाटील यांना रंगेहाथ पकडले. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महसूल साहाय्यक पाटील यांच्या विरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

# लहुजी शक्ती सेनेच्या ठाणे जिल्हा अध्यक्षपदी एकनाथ साबळे यांची नियुक्ती

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे आणि लहुजी शक्ती सेना महासचिव बालाजी गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात लहुजी शक्ती सेनेच्या ठाणे जिल्हा अध्यक्षपदी एकनाथ साबळे यांची नियुक्ती करण्यात आली.




हा निर्णय संघटनेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार, सामाजिक न्यायासाठी काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना प्रोत्साहन, आणि लहुजी शक्ती सेनेच्या विचारधारेचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला. एकनाथ साबळे यांनी संघटनेच्या ध्येय-धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आणि ठाणे जिल्ह्यातील युवकांमध्ये नेतृत्वगुण जागवण्याचे वचन दिले. त्यांनी सांगितले की, 'लहुजी शक्ती सेनेच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि मागासवर्गीय घटकांसाठी न्याय व समानतेसाठी लढण्याचे काम संपूर्ण ताकदीने केले जाईल.'

कार्यक्रमाला लहुजी शक्ती सेनेचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि स्थानिक नेते उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान संघटनेच्या आगामी कार्ययोजनांवरही चर्चा करण्यात आली. लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी एकनाथ साबळे यांच्या नेतृत्वाचा उल्लेख करत सांगितले की, 'त्यांच्या नेतृत्वाखाली ठाणे जिल्ह्यात संघटना अधिक बळकट होईल आणि संघटनेची उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे साध्य होतील.' साबळे यांच्यावर ठाणे जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील समाज बांधव व पदाधिकारी शुभेच्छांचा वर्षाव करीत आहेत.

# छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात डावलल्याने समर्थकांचे कल्याणमध्ये निषेध आंदोलन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

महाराष्ट्रात नुकतेच युती सरकार स्थापन झाले.

या सरकारला ओबीसी समाजाने अभूतपूर्व असे मतदान केल्यामुळेच इतके प्रचंड बहुमत मिळवता आले. परंतू ज्यांच्या आदेशानुसार सर्व ओबीसी समाजाने महायुतीला मतदान केले ते म्हणजे महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री, छगन भुजबळ. परंतु निवडून आल्यानंतर या सरकारला ओबीसींचा जणू विसर पडला आहे आणि त्यांनी भुजबळ यांना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात स्थान दिले नाही.

एक प्रकारे 'सामाजिक न्यायाचा जो चेहरा' आहे तोच या सरकारने नाकारला आणि याला सर्वस्वी जबाबदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार हेच आहेत. असा समस्त ओबीसी समाजाचा समज झाला आहे. त्यामुळेच कल्याण मधील ओबीसी समाजाच्या व भुजबळ समर्थकांनी आज निषेध आंदोलन केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण केल्यानंतर आंदोलन करण्यात आले. या आंदोलना मध्ये आयोजक ओबीसी संघर्ष समिती समन्वयक प्रशांत माळी, कल्याण पूर्वप्रमुख दुर्गेश बागुल, प्रमुख पदाधिकारी हिरामण बच्छाव, अशोक माळी, विक्रम बटवाल, युवराज लोंढे, आप्पा शेळके, वाल्मीक, वर्पे, विनोद झोपे, विलास उत्तेकर, आकाश नाथ व तर कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जर लवकरात लवकर भुजबळ यांना न्याय नाहीं दिला, तर ओबीसी समाज येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाला योग्य ती जागा दाखवून देईल असा इशारा देखील यातून देण्यात आला.

# कल्याणमध्ये उच्चभ्रू गृहसंकुलात राडा

## मंत्रालयात काम करणाऱ्या परप्रांतीयाची मराठी माणसाला मारहाण

### २४ तासांत आरोपीला अटक न केल्यास मनसे स्टाईलने धडा देण्याचा मनसेचा इशारा

### गाडीत अंबर लावून दहशत पसरण्याचा प्रयत्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याणमध्ये उच्चभ्रू गृह संकुलात मोठा राडा झाला असून मंत्रालयात काम करणाऱ्या परप्रांतीयाने मराठी माणसाला जबर मारहाण केली आहे. हा व्यक्ती गाडीत अंबर दिवा लावून दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप सोसायटीमधील नागरिकांनी केला आहे. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या व्यक्ती विरोधात खडकपाडा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर आरोपीला २४ तासांत अटक न केल्यास मनसे स्टाईलने धडा शिकवण्याचा इशारा मनसेने दिला आहे.

कल्याण पश्चिमेतील योगी धाम परिसरातील अजमेरा हाईटस या गृहसंकुलात राहणाऱ्या अखिलेश शुक्ला याने धूप लावण्याच्या वादातून दहा ते पंधरा जणाच्या टोळीला बोलवून सोसायटीतील तीन जणांना बेदम मारहाण केली. घटनेचा व्हिडिओ




सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. २४ तासात अखिलेश शुक्लाला अटक झाली नाही तर रस्त्यावर उतरु,शुक्ला जिथे कुठे असेल त्याला मनसे स्टाईलने पोलिस स्टेशनला हजर करु असा इशारा मनसेने दिला आहे. तर खडकपाडा पोलिसांनी या प्रकरणी परस्पर विरोधी गुन्हा दाखल करीत पुढील तपास सुरु केला आहे.अखिलेश शुक्ला याच्या शेजारी अभिजीत देशमुख आणि विजय कळवीकटे राहतात. बुधवारी रात्री शुक्ला याने घराबाहेर धूप लावला होता. धूपाच्या धुराचा शेजाऱ्यांना त्रास होता होता. याबाबत शेजारी विजय कळवीकटे याने शुक्ला याला टोकले. त्यावरुन त्यांच्यात वाद झाला. या वादातून शुक्ला याने बाहेरून दहा ते पंधरा जणाना बोलावून घेतले. सोसायटीतील लोकांना माराहाण केली. या मारहाणीत विजय कळवीकटे, अभिजीत देशमुख, धीरज देशमुख हे जखमी झाले आहेत. यातील अभिजीत देशमुख गंभीर जखमी असून त्यांच्यावर मुंबईच्या सायन रुग्णालायत उपचार सुरू आहेत.अखिलेश शुक्ला हा मंत्रालयात काम करटो. त्याच्या गाडीवर अंबर दिवा लावून फिरतो. त्याच्या विरोधात कोणी बोलले तर तो त्याला दमबाजी करतो. काही दिवसापूर्वी एका किरकोळ कारणावरुन त्याने एका तरुणीला तिच्यावर रेप करण्याची धमकी दिली होती. या राड्यानंतर खडकपाडा पोलिसांनी तपास सुरु केला आहे. या प्रकरणी खडकपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांनी सांगितले की, धूप लावण्याच्या वादातून हाणामारी झाली आहे. पोलिसांनी दोन्ही गटाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अखिलेश शुक्ला याच्या विरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरु केला आहे.दरम्यान अखिलेश शुक्ला हा सातत्याने मराठी माणसांना दमबाजी करतो. तुम्ही मराठी आहात. तुम्हाला माझी ताकद माहिती नाही. अशा प्रकारे लोकांना भिती दाखवितो. या बाबत मनसेचे जिल्हा अध्यक्ष उल्हास भोईर यांनी खडकपाडा पोलिसांची भेट घेतली आहे. अखिलेश शुक्ला याची मुजोरी मोडीत काढली पाहिजे. त्याची गुंडगिरी सातत्याने सुरु असते. २४ तासांत त्याला अटक केली नाही तर मनसे स्टाईलने शुक्ला याला धडा शिकवून त्याला पोलिसांच्या ताब्यात देऊ असा इशारा दिला आहे.

# भिवंडी महानगरपालिकेकडून श्वान दंशावरील लस नागरिकांसाठी उपलब्ध




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ भिवंडी(प्रतिनिधी) :**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महानगरपालिकास्तरावरून महानगरपालिकेच्या बीजीपी दवाखाना (सध्याचा पत्ता सोनापूर मस्जिद, बंगालपूरा, भिवंडी) येथे व शासनस्तरावरून शासनाच्या स्व. इंदिरा गांधी स्मृति उपजिल्हा रूग्णालय, भिवंडी येथे श्वान दंशावरील रूग्णांसाठी घ्हर. A.R.V. (Anti Rabies Vaccine) उपलब्ध आहेत.

मात्र सद्यःस्थितीत भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये श्वान दंशावरील रूग्णसंख्येत वाढ झालेली असल्याचे निदर्शनास आल्यामुळे श्वान दंशावरील रूग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य सो. भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका यांचे आदेशानुसार महानगर पालिकेच्या नवीवस्ती नागरी आरोग्य केंद्र (पत्ता- मनपा शाळा क्र. ८७, पाण्याची टाकी नवीवस्ती, भिवंडी) येथे महानगरपालिकास्तरावरून श्वान दंशावरील Inj. A.R.V. (Anti Rabies Vaccine) उपलब्ध करणेत आलेले आहे.तरी श्वानदंश केलेल्या जास्तीत-जास्त रूग्णांनी याचा लाभ घ्यावा व सदरचा संदेश आपल्या आस-पासच्या नागरीकांना व आपल्या मित्र मंडळी यांना द्यावा. असे आवाहन महानगर पालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य व डॉ. संदिप गाडेकर, वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी नागरीकांना केले आहे.

# भिवंडी येथील हॉटेलकरीता घेतलेल्या अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भिवंडी(प्रतिनिधी) :**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे नागांव घर नं.५४३ गैबीनगर, भिवंडी येथे अनधिकृत नळ कनेक्शन असल्याचे निर्दशनास आले होते,

दि.१२/१२/२०२४ रोजी केजीएन फास्ट फुड हॉटेल करीता श्री. नदम नायब रसुल यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे जल वाहिनीवर अनधिकृतपणे टॅपींग करुन अर्धा इंच व्यासाचे एक कनेक्शन हॉटेलकरीता घेतले असल्यामुळे त्याच्यावर शांतीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली आहे. सदरची कारवाई मा प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री. संदिप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शना खाली उप अभियंता श्री. सर्फराज अंसारी व श्रीमती. सायरा बानो अन्सारी यांचे आधिपत्याखाली श्री. विराज भोईर (पथक प्रमुख) यांचेमार्फत करण्यांत आली.

# महसूल सहाय्यकाला ४० हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले

### सातबाऱ्यावर नोंद करण्यासाठी मागितले होती लाच

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

महसूल सहाय्यकाला ४० हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले असून कल्याण तहसीलदार कार्यालयात ठाणे अँटी करप्शनने कारवाई केली आहे. जमिन खरेदी केल्यानंतर सातबाऱ्यावर नोंद करण्यासाठी लाच मागितली होती. संतोष पाटील (४६) असे लाच घेताना पकडलेल्या महसूल सहाय्यकाचे नाव आहे.संबंधित तक्रारदाराने कल्याण तालुक्यातील रायते गावी दहा गुंठे जमीन खरेदी केली आहे. या जमिनीचा सातबारा उतारा आणि फेरफार कायदेशीरपणे स्वतःच्या नावे नोंद होण्यासाठी तक्रारदार शेतकरी प्रयत्नशील होता. ही सातबारा, फेरफार नोंद होण्यासाठीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित तक्रारदाराने आवश्यक ती सर्व कागदपत्रे आणि शासकीय दाखले कल्याण तहसिल कार्यालयात जमा केले होते.

मात्र त्यानंतरही सात बाऱ्यावर नोंद होण्याचा प्रस्ताव पाठविण्यासाठी महसूल सहाय्यक संतोष पाटील यांनी तक्रारदाराकडे ४० हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. यासाठी लागणारी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनही पैसे मागितले जात असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्याने याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे विभागाकडे तक्रार केली होती. या तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पंचांसमक्ष पडताळणी केली असता संतोष पाटील हा पैशांची मागणी करत असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानुसार बुधवारी सायंकाळी कल्याण तहसील कार्यालयातील महसूल साहाय्यक कक्षाच्या पाठीमागील बाजूला शेतकऱ्याकडून ४० हजार रूपयांची लाच घेताना अँटी करप्शन विभागाने संतोष पाटीलला रंगेहाथ पकडले. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने महसूल साहाय्यक पाटील यांच्या विरुध्द गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# भवितव्य घडविण्यासाठी कौशल्य विकास महत्वाचे

### - जिल्हाधिकारी किशन जावळे



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता रायगड(प्रतिनिधी)**

उद्योजकता विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून बंद्यांना चांगले वायरमन निर्माण होण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमातून रोजगार खुले करता येणार आहे. कारागृहातून बाहेर पडल्यावर समाजात वावरत असताना या प्रशिक्षणाचा बंद्याना नक्कीच फायदा होणार आहे. त्यातून कुटूंबियाचे व समाजाचे हित साधण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भवितव्य घडविण्यासाठी कौशल्य विकास महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.


जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आयोजित अलिबागमधील जिल्हा कारागृहातील बंद्यासाठी उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षणाचा शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थित झाला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी लिड बँकेचे जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, जिल्हा कारागृह अधिक्षक अशोक कारकर, जिल्हा कौशल्य विकास केंद्रातील अधिकारी अमिता पवार, आयटीआयचे अमोल चव्हाण, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ बडोद्याचे अधिकारी, आदर्श पतसंस्थेचे पदाधिकारी व अधिकारी, कारागृहातील कर्मचारी व बंदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, जिल्हा कारागृहातील सर्वच बंद्यांना प्रशिक्षण मिळाले पाहिजे या भुमिकेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जिल्हा उद्योग केंद्रासह महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व आयटीआयच्या अधिकाऱ्यांनी यासाठी चांगले योगदान दिले आहे. घराघरात विद्युत जोडणी व उपकरणे आहेत. विजेशिवाय कोणीच राहू शकत नाही. त्यामुळे विद्यूत जोडणी, दुरुस्तीचे प्रशिक्षण या उपक्रमातून बंद्याना मिळणार आहे. हा उपक्रम महत्वाचा आहे. विद्युत जोडणीसह उपकरणे बसविण्यासाठी तारतंत्रीला प्रचंड मागणी आहे. त्यांची प्रत्येकाला गरज आहे. प्रशिक्षणातून अनेक वायरमन तयार झाल्यास त्याचा फायदा नक्की होईल. या कौशल्य विकासातून मन रमण्याची संधी बंद्यांना प्राप्त झाली आहे. त्यांच्याकडून विधायक काम यातून घडणार आहे. मनाचे एकाठिकाणी केंद्रीकरण व्हावे. बंद्यांना चांगले जीवन जगता यावे, त्यांच्या कुटूंबाचा व समाजाचा चांगला फायदा व्हावा हा उद्देश समोर ठेवून बंद्यांसाठी प्रशिक्षण सुरू केले आहे. पंधरा दिवस हे प्रशिक्षण असणार आहे. बंद्यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन चांगले शिक्षण घ्यावे, असे आवाहन जावळे यांनी केले.

बंद्याना चांगले प्रशिक्षण मिळावे. त्यांना रोजगाराची संधी निर्माण व्हावी यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार बंद्यासाठी प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. कारागृहातील बंद्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून त्यांच्यामध्ये अमुलाग्र बदल निर्माण करण्याचा प्रयत्न कायमच कारागृहाच्या माध्यमातून होत असल्याचा आनंद आहे. ग्रंथालयासह वेगवेगळे खेळदेखील कारागृहात घेऊन बंद्याना घडविण्याचा व त्यांच्यामध्ये चांगले विचार निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे जिल्हा कारागृह अधीक्षक अशोक कारकर यांनी सांगितले.




२० डिसेंबर २०२४
शुक्रवार

**मेष**
तरुणांना त्यांच्या करिअरशी संबंधित काही चांगली बातमी मिळू शकते. दिवस तुमच्यासाठी आनंदाने भरलेला असणार आहे. महत्त्वाची बातमी मिळेल.

**वृषभ**
मालमत्तेशी संबंधित एखादे वादग्रस्त प्रकरण असल्यास, अनुभवी व्यक्तीच्या मदतीने ते निकाली काढण्याची वाजवी शक्यता आहे. तणावमुक्त व्हाल.

**मिथुन**
या राशीच्या सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते आणि चांगली बातमी मिळेल. तुमच्या मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल.

**कर्क**
जे तुमच्या भविष्यासाठी खूप फायदेशीर ठरेल. तुमचा सकारात्मक दृष्टीकोन आणि बाहेरील कामांमध्ये योग्य ताळमेळ राहील. काम पूर्ण करू शकाल.

**सिंह**
दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. अनुभवी व्यक्तीच्या मार्गदर्शनाने सर्व काम नियोजित रीतीने पूर्ण होतील.अद्भुत ऊर्जा जाणवेल.

**कन्या**
चांगली बातमी मिळेल.तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होताना दिसत आहेत आणि काही कामे वेळेपूर्वी पूर्ण केल्याने तुम्हाला आनंद मिळेल.

**तूळ**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. कोणतेही काम करण्यापूर्वी त्याची संपूर्ण माहिती जरूर घ्या. तुम्ही उत्पादन तसेच त्यांच्या गुणवत्तेकडे अधिक लक्ष द्याल.

**वृश्चिक**
तरुण त्यांच्या भविष्याशी निगडीत कामांबाबत पूर्णपणे गंभीर असतील. कुटुंबात विशेष लोकांचे आगमन होऊ शकते, तुम्ही त्याच्या तयारीत व्यस्त असाल.तुम्हाला

**धनु**
इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांना लाभाची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात जवळीक वाढेल. संध्याकाळी आपण बाहेर जेवू. मुलांशी परस्पर स्नेह वाढेल.

**मकर**
दिवस तुमच्या अनुकूल आहे. दुसऱ्याला दिलेले पैसे परत केले जातील.उत्पन्नही वाढेल. मुलांच्या शिक्षणाबाबत सुरू असलेली कोणतीही अडचण दूर होईल.

**कुंभ**
तुमच्या आयुष्यातील काही मोठा निर्णय घ्यायचा आहे, परंतु काही गुंतागुंतीमुळे तुम्ही अडकले आहात.वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल.

**मीन**
शिक्षकांच्या बदलीच्या अडचणी संपतील, हव्या त्या ठिकाणी बदल्या होतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल. व्यवसायात यशाच्या अनेक संधी मिळतील.

दैनिक जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.


:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# मुरबाड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री.कल्पेश शिंदे प्रथम



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी) :** पंचायत समिती मुरबाड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन १६ डिसेंबर ते १८ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात पदमश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नति मंडळ भिवंडी संचलित तळेगाव विभाग हायस्कूल तळेगाव ता मुरबाड या विद्यालयाचे शिक्षक समुपदेशक श्री कल्पेश मनोहर शिंदे यांनी आदर्श भारताचे उद्याचे भावी वैज्ञानिक व गणिततज्ञ घडविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला आणि सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून माध्यमिक शिक्षक अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य' बनवून या स्पर्धेत भाग घेतला होता. या विज्ञान प्रदर्शनात श्री कल्पेश मनोहर शिंदे हे माध्यमिक शिक्षक अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. याबद्दल त्यांना गटविकासअधिकारी सन्माननीय लता गायकवाड मॅडम,गटशिक्षणाधिकारी संप्रदा पानसरे मॅडम, विस्तार अधिकारी श्री संजय थोरात साहेब, टिळक स्कॉलर विद्यालयाच्या प्राचार्या विशाखा मॅडम या मान्यवरांच्या शुभहस्ते गौरवचिन्ह,सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आणि सरांची जिल्हास्तरासाठी निवड झाल्याबद्दल सरांचे शालेय सल्लागार समितीचे चेअरमन श्री अरुणबंधू चौधरी,सदस्य श्री दीपक देशमुख,श्री श्रीकांत देशमुख आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ फुलपगारे मॅडम,शिक्षक प्रतिनिधी श्री मंगल कोळी सर ,सर्व शिक्षक,सर्व पालक,सर्व विद्यार्थी पंचक्रोशीतील पालकवर्ग यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्री कल्पेश शिंदे सर यांनी संस्थेच्या व शाळेच्या इतिहासात मानाचा तुरा रोवल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातुन कौतुक होत आहे. आणि सरांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# कर्मयोगी संत गाडगे महाराज



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६८ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

### वासिंदमध्ये बौद्ध समाजाच्या वतीने
# मुक रॅली काढून शहर बंद

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता वासिंद(प्रतिनिधी) :** परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ येथील बौद्ध समाजाच्या वतीने शहरात मुक रॅली काढून शहर बंद पाळण्यात आले.

परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावरील दगडफेक आणि संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाचा पोलीस कोठडीत झालेल्या संशयास्पद मृत्यू या घटनेच्या निषेधार्थ मुक रॅली काढून शहरात बंद पाळण्यात आले.



यामध्ये राजेश निकम, जितेंद्र जाधव, प्रविण केदारे, बाळकृष्ण गायकवाड, प्रकाश वाघमारे, नंदकुमार सोष्टे, गुरुनाथ गायकवाड, रविंद्र जाधव, जीवन पंडित, संजीव जाधव, सुनील जाधव, सिद्धार्थ साळवे, के. एन.धनगर, ॲड.भावना निकम, ॲड. प्रतिभा कांबळे, भारती सोष्टे, जयश्री शेवाळे, प्रशांत गायकवाड, नरेंद्र कोचुरे, गणेश अहिरे आदी आंबेडकरी चळवळीतील सर्व राजकीय, सामाजिक, धार्मिक चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते बौद्ध समाजाच्या बॅनरखाली एकत्रित येऊन मुक रॅली व बंद यशस्वी पाळण्यात आला.

# मुरबाड - कल्याण रेल्वे प्रकल्पासाठी त्वरित कार्यवाहीची मागणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी) :** मुरबाड-कल्याण रेल्वे प्रकल्पामध्ये होत असलेल्या विलंबामुळे मुरबाड नागरिक मंचाचे संयोजक व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक ठाणे जिल्हाध्यक्ष कृष्णाकांत मधुकर मलिक यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी यासंदर्भात रेल्वे मंत्रालयाकडे एक पत्र पाठवून प्रकल्पासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे.






मलिक यांनी पत्रात म्हटले आहे की, भारतातील पहिल्या रेल्वे मार्गाच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या समाजसुधारक नाना शंकर शेठ यांचे जन्मस्थान असलेल्या मुरबाड येथे रेल्वेची कनेक्टिव्हिटी नसणे ही मोठी दुर्दैवाची बाब आहे. या भागाच्या विकासासाठी आणि येथील रहिवाशांच्या सोयीसाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्याच्या अंमलबजावणीत होणारा विलंब स्थानिकांना त्रासदायक ठरत आहे. मुंबईच्या व्यस्त जीवनातून दूर असलेला मुरबाड हा शांत आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी लोकप्रिय ठिकाण आहे. येथे अनेक पर्यटन स्थळे आहेत. तसेच अनेक चाकरमान्यांना नोकरी धंद्यासाठी मुंबई व उपनगर परिसरात जावे लागते मात्र, रेल्वे कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे मुरबाड येथील विद्यार्थी व कामगारांना मुंबईला जाणे कठीण झाले आहे. यामुळे नोकरी, पर्यटनाला आणि स्थानिक उद्योगांनाही मोठा फटका बसला आहे.

मुरबाड-कल्याण रेल्वे प्रकल्प पूर्ण झाल्यास मुरबाड आणि परिसरातील नागरिकांना मुंबईला सहजपणे प्रवास करता येईल. यामुळे मुरबाड मधील पर्यटन उद्योगाला चालना मिळून रोजगार निर्मिती होईल. तसेच, स्थानिक उत्पादनांची बाजारपेठ वाढून शेतकरी आणि व्यापारी वर्गाला मोठा फायदा होईल. मलिक यांनी मंत्रालयाकडे जमीन संपादनास प्राधान्य देण्याची, प्रलंबित मंजुरी मागणी करण्याची, पुरेसे निधी उपलब्ध करून देण्याची आणि प्रकल्पाच्या प्रगतीबाबत जनतेशी पारदर्शक संवाद साधण्याची मागणी केली आहे. तसेच या प्रकल्पाला प्राधान्य देण्याची आणि विद्यमान अडथळे दूर करण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली आहे.

# श्री कमलाकर नाथा भेरले यांच्यावर जीवघेणा हल्ला

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** दि. १५ डिसेंबर २०२४ रोजी कल्याण तालुक्यातील मांजर्ली गावामध्ये मांजर्ली ते आपटी हे रस्त्याचे काम सुरू होते. सदर काम हे मांजर्ली कडून आपटी कडे जाणारा रस्ता म्हणून मंजूर असताना ठेकेदाराने मांजर्ली मधील कोणत्याही ग्रामपंचायत सदस्याला विश्वासात न घेता बाहेरील फार्महाऊस धारकांच्या फायद्या करिता मधेच काम सुरू केले ज्याचा कुठल्याही प्रकारचा फायदा गावकरी किंवा शेतकरी यांना होत नसून थेट बाहेरून आलेल्या उद्योजकांना त्याचा फायदा होत असल्याचे लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते आकाश घारे यांनी ही बाब ग्रामपंचायत कार्यकारणी च्या लक्षात आणून दिली. व त्यासंबंधी सदर काम करत असलेल्या VR construction कंपनीच्या विश्वास मिरकुटे यांच्याशी बोलण केल्यानंतर त्यांनी आपण यातून काही तरी मार्ग काढू व भेटून बोलू असे सांगितले

त्यांनतर विश्वास मिरकुटे हे स्वतः उपस्थित न राहता त्यांनी त्यांचे सहकारी राजू कराले यांना भेटण्यासाठी पाठविले त्यावेळी मा. सरपंच श्री मनोहर घारे , शाम शिसवे, विकास गायकर , यश भगत , ई मंडळी उपस्थित होती , त्यांनी राजू कराळे यांच्याशी बोलण्यासाठी त्यांना बाजूला घेऊन सकारात्मक चर्चेला सुरुवात केली.. एवढ्यात उपसरपंच कमलाकर भेरले त्याठिकाणी पोहचले व पोहचताच त्यांनी रस्त्याचं काम करण्यासाठी आलेल्या मजुरांना काम बंद करा. चर्चा सुरू आहे, जो पर्यंत चर्चा होत नाही तो पर्यंत काम बंद करा म्हणून आवाहन केले , तेवढ्यात तेथे उपस्थीत असलेल्या राजू कराळे यांच्या लहान भावाने कमलाकर भेरले यांना शिविगाली करत तुझ्या बापाचा रस्ता आहे का? असे म्हणत हिणवले. कमलाकर भेरले यांचे काही एक ऐकून न घेता कमलाकर भेरले बेसावध असताना अचानक त्यांच्यावर हल्ला केला . व त्यांच्या डोळ्यावर ईजा पोहचवली त्यात कमलाकर भेरले खाली पडले ,खाली पडल्यानंतर त्याला मार हान केली याबाबत

टिटवाळा पोलिस स्थानकात घडलेला प्रकारची तक्रार नोंदविण्यात आली आहे. जखमी उपसरपंच भेरले यास डॉक्टरांनी सेंट्रल हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी पाठविले आहे.

### राज्य माहिती आयोगाने मुरबाडमधील
# २० ग्रामसेवकांना २५ हजारांचा ठोठावला दंड

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(दिलीप पवार) :** माहितीच्या अधिकारात अर्जदारास माहिती न दिल्या प्रकरणी राज्य माहिती आयोगाचे कोकण खंडपीठाने मुरबाड तालुक्यातीलशिवळे, माल्हेड, देवपे,सायले,सासणे, न्हावे,फणसोली, खानिवरे, करवेळे, अशा सुमारे विस ग्रामसेवकांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याची माहिती समोर आल्याने या ग्रामसेवकावर जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीचे अधिकार्यांचे नियंत्रण होते की नाही अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत असले तरी ग्रामसेवकांमध्ये खळबळ उडाली आहे.

केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या विविध योजना तसेच मुलभूत सुविधा ग्रामीण भागात पोहोचविण्यासाठी महत्वाचा घटक म्हणजे ग्रामसेवक, हा ग्रामविकासाचा कणा समजला जातो.त्यांनी आपल्या ग्रामपंचायत कारभारात किती सतर्कता आणि पारदर्शकता ठेवली आहे.याची माहिती अधिकार मध्ये माहिती घेण्यासाठी अनेक नागरिक अर्ज करतात.अशा प्रमाणे मुरबाड तालुक्यातील सुमारे विस ग्रामपंचायत कडे ॲड.नितीन देशमुख यांनी माहिती मागितली असता ती माहिती देण्यात सर्वच ग्रामसेवकांनी उदासीनता दाखविल्याने देशमुख यांनी प्रथम आपिल दाखल केले.परंतु प्रथम आपिलात माहिती देण्याचे आदेश असताना ग्रामसेवकांनी त्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याने देशमुख यांनी राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठाकडे अपिल दाखल केले असता अपिलकाराची बाजु समजुन घेत आयोगाने ग्रामसेवका कडून माहिती न दिल्याचा खुलासा मागवुन माहिती देण्यात कसुरता केल्यामुळे प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचा दंड ठोठावला असुन ते त्यांचे वेतनातुन कपात करण्याचे आदेश गटविकास अधिकारी पंचायत समिती मुरबाड यांना दिले आहेत.

**आयोगाने दिलेल्या आदेशानुसार वसुली सुरू केली आहे.ग्रामसेवकांनी आपल्या कामात पारदर्शकता ठेवली नाही तर त्याची माहिती मागणे, तक्रारी करणे.व आंदोलने,उपोषणे करणे आणि मग वरिष्ठांकडून होर्णाया चौकशीला सामोरे जावे लागते हा मानसिक त्रास सहन करुन घेण्यापेक्षा आपल्या कामात पारदर्शकता ठेवावी. अशा सुचना दिल्या आहेत**
**- लता गायकवाड.**
**गटविकास अधिकारी**
**पंचायत समिती मुरबाड.**

### कल्याण पूर्वेत
# भव्य नशामुक्ती शिबीर

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(शरद शहाणे)** कल्याण पूर्व येथे सहयोग सामाजिक संस्था आणि निलेश शिंदे फाउंडेशन आयोजित भव्य नशा मुक्ती शिबिर कल्याण पूर्व **भव्य नशा मुक्ती शिबिर विनामूल्य** दारू व्यसनावर समुपदेशन, औषधोपचार अगदी मोफत दारू व्यसन सोडविण्यासाठी हार्मोन्स बॅलन्स इम्युनो थेरपी४८ तासात दारूची इच्छा भावना बंद करणारे आयुर्वेदिक उपचार रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते तीन वाजेपर्यंत स्थळ मंदिर हायस्कूल काटे मानिवनली कल्याण पूर्व येथे सहयोग सामाजिक संस्था आणि निलेश फाउंडेशन आयोजित भव्य नशाबंदी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या मोफत नशा मुक्ती शिबिराचे उद्घाटक नव निर्वाचित आमदार माननीय सौ सुलभाताई गणपत शेठ गायकवाड कल्याण पूर्व, त्याचप्रमाणे उद्घाटक माननीय श्री जगन्नाथ (अप्पा साहेब )शिंदे अध्यक्ष ऑल इंडिया केमिस्ट असोसिएशन. यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे.

या शिबिरात तज्ञ डॉक्टर कृष्णा रामचंद्र भावले BAMS MD M.a pathology DPS neuro. pathology. व्यसनमुक्ती मानसिक आरोग्य तज्ञ यांना एक लाख रुग्णांचा अनुभव असणारे असे हे डॉक्टर रुग्णांवर उपचार करणार आहे.

त्याचप्रमाणे इंजि. कैलास गिरसे अमेरिका हे सुद्धा सहभाग घेणार आहे.या शिबिरात येणारा औषधाचा संपूर्ण खर्च सहयोग संस्था आणि निलेश शिंदे फाउंडेशन करणार आहे.

स्वागत अध्यक्ष माननीय श्री निलेश शिवाजी शिंदे कल्याण शहर प्रमुख माजी नगरसेवक, नाव नोंदणीसाठी संपर्क - सौ मोनिका अडांगळे -९८९२०५३७२५. सुभाष म्हस्के ९३२०५०५७०४, कालिदास मामा कदम ज्येष्ठ समाजसेवक - ९१६७१६७१७४, श्री विजय प्रभाकर भोसले अध्यक्ष सहयोग सामाजिक संस्था कल्याण पूर्व ९९६७३३०९५१.

# अमित शहांविरोधात उल्हासनगरात आंबेडकरी अनुयायी संतप्त...

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता उल्हासनगर(प्रतिनिधी) :** केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी संसदेत भाषण करताना बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भात एकेरी व गौणत्वदर्शक उल्लेख केल्या विरोधात देशभरात आंबेडकरी अनुयायां मध्ये संतापाची लाट उसळली आहे.या वक्तव्याचा उल्हासनगर शहरातुनही तिव्र निषेध व्यक्त करण्यात आला. उल्हासनगर कॅम्प ४ च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात भिम



अनुयायांनी मोठ्या प्रमाणात जमुन अमित शहा विरोधात संतापजनक घोषणा दिल्या.

यातील काहींनी हातात आंबेडकरांची प्रतिमा तर काहींनी अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध करणार्या आशयाचे फलक हातात धरले होते. यावेळी अमित शहा यांच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनात मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायी आणि महिला वर्ग सहभागी झाला होते.

# हनिमुनला जाण्यावरुन सासऱ्याचा जावयावर ॲसिड हल्ला

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** सासऱ्याने जावयावर ॲसिड हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार कल्याणमध्ये घडला आहे. या हल्ल्यात जावई गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हनिमुनला जाण्यावरुन सासरा आणि जावई यांच्यात वाद झाल्याने त्या वादातून हा हल्ला केला असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी बाजारपेठ पोलिस ठाण्यात सासऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस सासऱ्याचा शोध घेत आहेत. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली आहे.ईबाद फालके असं जावयाचं नाव असून जकी खोटाल असे हल्लेखोर सासऱ्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जावई आणि मुलीने प्राथनेसाठी मक्का मदिनेला जावे, अशी सासरा जकी खोटालची मागणी होती. मात्र, जावयाने आम्ही काश्मीर ला जाणार असल्याचे सासऱ्यांना सांगितले.

यावरुन त्यांचा काही दिवसांपासून वाद सुरू होता.दरम्यान, जावई आणि मुलगी हनिमुनला कुठे जाणार दोघांमध्ये वाद असतानाच सासऱ्याने जावयावर ॲसिड हल्ला केला. या हल्ल्यात जावई गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# टिटवाळ्यात विद्युत शॉक लागून कंत्राटी कामगाराचा मृत्यू

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** टिटवाळा मांडा परिसरात पाणीपुरवठा वाहिन्याचे लिकेज काढण्याचे काम सुरू असताना शॉक लागून एका कंत्राटी कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडल्याने परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे.

मांडा टिटवाळा परिसरातील रविंद्र ऑर्किड परिसरात जल वाहिन्यांचे लिकेज काढण्याचे काम सुरू होते. पाणी काढण्यासाठी सबमर्शिबल पंप लावला होता. याठिकाणी ठेकेदाराचा कंत्राटी कामगार अरूण कांबळे हा काम करीत असताना पाण्यामध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने अरूण यांस विद्युत शॉक लागल्याने मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी दुपारी घडली.

अरूण यांचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी रुक्मिणीबाई रूग्णालयात नेण्यात आला असल्याची माहिती अधिकारी सूत्रांकडून मिळाली.

मोहने परिसरात अरूण कांबळे यांच्या शॉक लागून मृत्यू झाल्याची वार्ता मिळताच परिसरात एकच हळ हळ व्यक्त होत होती. अरूणच्या पश्चात दोन लहान मुले, पत्नी यांच्यावर दुखाचा डोंगर कोसळला आहे.

## नागपूर हिवाळी अधिवेशन कल्याण पूर्वेसाठी आरोग्यसेवेचा निर्धार



आज हिवाळी अधिवेशनात कल्याण पूर्वेतील नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी आरक्षित भूखंडावर तातडीने ताबा घेऊन अत्यावश्यक असलेल्या सुसज्ज रुग्णालय उभारणीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची ठोस मागणी केली.कल्याण पूर्वेसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. या रुग्णालयामुळे स्थानिक नागरिकांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवांचा लाभ मिळेल आणि त्यांना लांबच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही.शासनाने तातडीने हा निर्णय घ्यावा यासाठी विधिमंडळ कामकाजात हा मुद्दा उपस्थित केला.

## केंद्र शासन ग्रामीण विकास मंत्रालय तर्फे
# कारागृहातील बंदीसाठी प्रशिक्षण शिबीर
### मशरूम लागवड व गांडूळ खत निर्मिती प्रशिक्षण संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :** अपर पोलीस महासांचालक व महानिरीक्षक कारागृह वसुधारसेवा व महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.प्रशांत बुरडे (भा.पो.से) यांच्या संकल्पनेतून व कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग श्री.योगेश देसाई, यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (MRSETI) ठाणे व विभागीय कार्यालय बँक ऑफ महाराष्ट्र, ठाणे यांच्या संयुक्त विद्यामाने कारागृहातील बंदी मुक्त झाल्यावर रोजगार उपलब्ध होईल व पुन्हा गुन्हेगारीकडे वळणार नाही, याकरिता खुले कारागृहातील शिक्षा बंद्यांसाठी दि.१७ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित 'मशरूम लागवड व गांडूळ खत निर्मिती'प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक श्रीमती राणी भोसले व जिल्हा अग्रणी बँकेचे प्रमुख जिल्हा व्यवस्थापक श्री.अभिषेक पवार यांच्या हस्ते पार पडले.

या प्रशिक्षण कार्यक्रम उद्घाटनाकरिता अतिरिक्त अधीक्षक श्री.राजाराम भोसले, महाबँक MRSETI, ठाणे संचालक श्री. आशीष लोहकरे व वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.के.पी. भवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अल्का देवरे (विषयतज्ञ) यांनी केले. जिल्हा अग्रणी बँक प्रमुख जिल्हा व्यवस्थापक श्री.अभिषेक पवार यांनी मशरूम लागवड व गांडूळ खत निर्मितीबाबत उपस्थित बंद्यांना प्रशिक्षणाची सविस्तर माहिती देवून प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या बंदीना कारागृहातून मुक्त झाल्यानंतर महाराष्ट्र बँकेकडून स्वयंरोजगाररकरिता देण्यात येणाऱ्या कर्जाबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे कारागृह अधीक्षक श्रीमती राणी भोसले यांनी बंदींकरिता सुरु करण्यात आलेल्या प्रशिक्षणामध्ये जास्तीत जास्त बंद्यांनी सहभाग घेवून यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन केले.

तसेच कारागृहातून मुक्त झाल्यावर स्वयंरोजगाराकरिता बंद्यांकरिता महाराष्ट्र बँकेकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यास प्रशासनाकडून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

हे प्रशिक्षण कारागृहाच्या शेती विभागात पार पाडणार असून मशरूम लागवड व गांढूळ खत निर्मिती या व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता प्रथम बॅचमध्ये एकूण- ३५ बंद्यांनी सहभाग घेतला असून MRSETI, ठाणे यांच्याद्वारे नियुक्त प्रशिक्षकाद्वारे सहा दिवसांचे प्रशिक्षण देवून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या बंद्यांना कौशल्य विकास विभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, असे महाबँक आरसेटी, ठाणे संचालक आशिष लोहकरे यांनी कळविले आहे.

## टिटवाळा रेल्वे स्थानक सल्लागार समिती आणि अधिकाऱ्यांची बैठक संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** मध्य रेल्वे अंतर्गत टिटवाळा रेल्वे स्थानक सल्लागार समिती सदस्य व अधिकारी यांची बैठक नुकतीच संपन्न झाली. टिटवाळा स्थानक भारतीय रेल्वेच्या महत्वकांक्षी अशा अमृत भारत योजनेत समाविष्ठ केले आहे. तसेच गतीशक्ती योजनेतून देखील या स्थानकाचा विकास होत आहे. हा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर या स्थानकाचे स्वरुपच बदलून जाणार आहे. यासाठी भारत सरकारच्या सुचनेनुसार मध्य रेल्वे प्रशासनाने टिटवाळा रेल्वे स्थानक सल्लागार समिती गठित केली आहे. या स्थानकाचा अमृत भारत योजनेत समावेश झाल्यानंतर केडीएमसीच्या माजी उपमहापौर उपेक्षा शक्तिवान भोईर यांनी मध्य रेल्वे व्यवस्थापक यांना भेटून विविध मागण्यांचे पत्र दिले होते.

त्यापेकी मागण्यासंदर्भात सल्लागार समिती आणि प्रशासन यांची दि.१७ ऑगस्ट २०२४ रोजी महत्वपूर्ण विषयावर चर्चा झाली होती. टिटवाळा रेल्वे स्थानक सल्लागार समिती सदस्य अनिल फड, अजय मिश्र, विजय आव्हाड, स्वप्निल पाठारे, गिरिष भोय व धनंजय कान्हेरे तथा रेल्वे विविध विभागाचे अधिकारी या सल्लागार समिती बैठकिसाठी उपस्थित होते. यावेळी सदस्यांनी विविध समस्या मांडल्या, तक्रारी केल्या व संबंधित तक्रारींचे निवारण लवकर करण्याच्या सुचना प्रशासनास केल्या. तसेच अधिकारी व सदस्यांनी परिसराची पाहणी केली. परिसरात होणारे अतिक्रमण, अवैध बाबी आणि अतक्रमण यासंबधी तात्काळ लक्ष घालण्याच्या कडक सुचना दिल्या गेल्या आहेत.टिटवाळा स्टेशन परिसराचा विकास हा दोन फेज मध्ये होणार असून समितीने पहिल्या बैठकित केलेल्या जवळपास सर्व मागण्या मंजूर झाल्या असून सर्व सुचनांचा समावेश सुध्दा विकास आराखड्यात केला असल्याचे रेल्वे प्रशासनाने या वेळी सांगितले आहे. अत्यंत महत्वाचे म्हणजे माजी उपमहापौर उपेक्षा भोईर व त्यांच्या मार्गदर्शना खाली समिती सदस्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे कल्याण दिशेला मांडा पूर्व -पश्चिम रहिवांशासाठी पादचारी पुल बंद केलेल्या रेल्वे गेटवर मंजूर करण्यात आला आहे. महिलासांठी विशेष हिरकणी कक्ष तयार होणार असल्याचेही उपस्थित अधिकारी यांनी सांगितले आहे.

टिटवाळा रेल्वे स्टेशन विकासासंबंधी काहिही समस्या किंवा सुचना असतील तर आमच्याशी संपर्क करावा असे आवाहन टिटवावा रेल्वे स्थानक सल्लागार समितीच्या वतिने नागरिकांना व प्रवाशांना करण्यात आले आहे.

## शासकीय योजनांच्या माध्यमातून
# आर्थिक सक्षमीकरणासाठी तृतीय पंथीयांना शक्यतोपरी मदत करु

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** शासकीय योजनांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणासाठी व सामाजिक बळकटीकरणासाठी तृतीय पंथीयांना शक्यतोपरी मदत करु असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केले.

बुधवारी सायंकाळी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या दालनात तृतीय पंथीय समुदायाच्या प्रतिनिधीनींसमवेत आयोजिलेल्या बैठकीत बोलताना आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले.



शासनाने तृतीय पंथीयांसाठी धोरण जाहिर केले असून महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या पुढाकाराने समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी आयुक्त दालनात तृतीय पंथीयांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस महापालिकेच्या उपायुक्त स्वाती देशपांडे कुलकर्णी, वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.दिपा शुक्ला, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, तृतीय पंथीयांच्या जिल्हा आयकॉन व किन्नर अस्मिता संस्थेच्या अध्यक्षा निता केणे व त्यांचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.या बैठकीत आयुक्तांनी तृतीय पंथीयांच्या अडचणी समस्या जाणून घेतल्या. तृतीय पंथीयांना आत्मनिर्भर व स्वावलंबी होण्यासाठी मदत करावी अशी विनंती तृतीय पंथीयांमार्फत करण्यात आली. त्यावेळी लाईट हाऊच्या माध्यमातून तृतीय पंथीयांना प्रशिक्षण दिले जाईल. त्याचप्रमाणे बचत गटाच्या माध्यमातून तसेच शासकीय योजनांच्या माध्यमातून त्यांना महा पालिकेमार्फत शक्य तितकी मदत केली जाईल. तसेच आधारकार्डाअभावी तृतीय पंथीय शासकीय योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित रहात असल्यामुळे त्यांना आधारकार्ड बनवून देण्यास महा पालिकेतर्फे सहकार्य केले जाईल अश्या शब्दात आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आश्वासित केल्यामुळे तृतीय पंथीयांच्या चेह-यावर समाधानाचे हास्य फुललेले दिसून आले.

निवडणूक कालावधीत तृतीय पंथीयांना महापालिकेमार्फत निवडणूक कार्ड वितरीत करण्यात आले होते. त्याबाबत तृतीय पंथीयांनी आयुक्त महोदयांचे आभार मानले. महाराष्ट्र शासनाच्या तृतीय पंथीय धोरणाच्या अंमलबजावणीस प्रथमः महापालिकेतर्फे प्रारंभ करण्यात आला असून तृतीय पंथीयांसाठी लवकरच किन्नर महोत्सवाचे आयोजन महापालिकेच्या नाटयगृहात करण्यात येईल अशी माहिती समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी या बैठकीत दिली.

## बदलापुरात सोनसाखळी चोराला अटक



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता बदलापुर(प्रतिनिधी) :** खरंतर गूगल आणि युट्यूब हे नवशिक्यांना अनेक विधायक कामे, प्रशिक्षणं घेऊन अनेक जण वेगवेगळया कला अवगत करण्याचा सर्वोत्तम पर्याय आहे. पण याच युट्यूबवर सोनसाखळी चोरीच्या अनोख्या ट्रिक्स शिकुन बदल ापुरात चेन स्नॅचिंग करणारा एक अट्टल सोनसाखळी चोर बदलापूर पूर्व पोलिसांच्या जाळयात अडकला आहे. प्रवीण प्रभाकर पाटील असं या चोरट्यांचं नाव आहे.

झटपट पैसे कमवण्यासाठी या जगात काही जण शॉर्ट कर्ट वापरतात. असा एक प्रकार करणार्या एका चोरांचा बदलापूर पूर्व पोलिसांनी शोध लावलाय. बदलापूर पूर्व आणि पश्चिम पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसात चेन स्नॅचिंगचे सलग ५ गुन्हे घडले होते. याप्रकरणी बदलापूर पोलिसांचा कसुन तपास सुरू होता. अशातच बदलापूर शहरात संशयास्पद पणे फिरणाऱ्या एका इसमाला पोलिसांनी पाठलाग करून ताब्यात घेतलं. त्याची चौकशी केली असता त्याने आपणच चेन हे स्नॅचिंगचे ५ गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिलीय. प्रविण हा कर्जत जवळच्या शेलू इथं राहणारा आहे. याच्यावर आधी कर्जत तालुक्यात हत्येच्या प्रयत्नाचा एक गुन्हा दाखल आहे. त्यानंतर त्याने पटापट पैसे कमावण्याच्या उद्देशाने युट्यूबवर चेन स्नॅचिंग कशी करावी? याच्या माहिती देणारे व्हिडिओ सर्च करून ट्रिक्स शिकायला सुरुवात केली.

त्यानंतर बदलापूर शहरात एकटाच येऊन तो चेन स्नॅचिंग करू लागला.अखेर,बदलापूर पूर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर आणि गुन्हे पोलीस निरीक्षक राजेश गजल यांच्या मार्गदर्शना खालील टीमने प्रवीण पाटील याला वेळीच बेड्या ठोकल्या. पोलिसांनी या गुन्ह्यांमध्ये चोरीला गेलेलं साडेचार तोळे सोनं देखील हस्तगत केल्याची माहिती उल्हासनगरचे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

## बेलापूर कौटुंबिक न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालत संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :** बेलापूर कौटुंबिक न्यायालयात नुकतेच राष्ट्रीय लोकअदालतीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.या लोकअदालतीमध्ये एकूण २३ प्रकरणे निकाली काढण्यात आली, ज्यामध्ये ९ प्रकरणांमध्ये पती-पत्नींनी एकमेकांसोबत पुन्हा एकत्र येण्याचे ठरवले.

तसेच, एक प्रकरण ८५ वर्षीय वडील आणि त्यांचे दोन मुले यांच्यातील होते, ज्यात एक मुलगा अमेरिकेत राहतो. हे प्रकरण सुद्धा समाधानकारक पद्धतीने निकाली काढण्यात आले. मुलांनी त्यांच्या वडिलांच्या शर्तींना मान्यता दिली आणि वडिलांची काळजी घेण्याचे वचन दिले.

लोकअदालतींचे महत्त्व अधोरेखित करणारे हे आयोजन अतिशय महत्त्वाचे आहे. लोकअदालतींमुळे विवादांचे जलद आणि किफायतशीर समाधान मिळते, ज्यामुळे न्यायालयाच्या प्रक्रियेत होणारा विलंब टाळला जातो. या प्रक्रियेमुळे वादी व प्रतिवादींमध्ये मैत्रीपूर्ण नाते वाढते आणि सामाजिक सलोखा प्रस्थापित होतो.

सर्व एकत्र आलेल्या पती-पत्नींना आणि वडील आणि मुलांना रोपे देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमातून लोकांना लोकअदालतीच्या माध्यमातून विवाद सोडविण्याचा संदेश देण्यात आला.

कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश डॉ. रचना तहेरा यांनी या यशस्वी उपक्रमासाठी सर्वांचे आभार मानले. तसेच, कौटुंबिक न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे लोक अदालती चा हा उपक्रम यशस्वी झाला असल्याचे त्यांनी नमूद केले.या उपक्रमाने नक्कीच विवाद सोडविण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली असून, सामान्य जनतेसाठी न्यायप्राप्ती अधिक सुलभ झाली.

## गड/किल्ले, समुद्र किनारी, धबधबे इत्यादी ठिकाणी येणाऱ्या
# पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत उपाययोजना कराव्यात

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता रायगड(प्रतिनिधी) :** नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने तसेच नाताळ सणाच्या सुट्टीमुळे कोकणामध्ये विशेषतः रायगड जिल्ह्यामध्ये प्रसिध्द गड किल्ले, धबधबे, तलाव, नदी समुद्राकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. यापूर्वी समुद्रामध्ये बुडून, धबधबे, तलावाच्या ठिकाणी पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांची संभाव्य जीवित हानी होऊ नये, यासाठी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी संबंधित विभागांनी आपल्या स्तरावरुन पुढीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड-अलिबाग संदेश शिर्के यांनी दिल्या आहेत.नगरपालिका/ग्रामपंचायतीमार्फत सर्व बीचेसवर, गड किल्ले, धबधब या ठिकाणी बोर्ड/फ्लेक्स बोर्ड/बॅनरव्दारे सुचनाफलक लावावेत. गड/किल्ले, धबधबे, समुद्र किनाऱ्यावर बिचवर पोलीस विभागाने पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. मुख्य अधिकारी यांनी नगरपालिके च्या क्षेत्रामध्ये तसेच तहसिलदार/गटविकास अधिकारी यांनी ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून पर्यटनस्थळी सुरक्षेच्या दृष्टीने रुग्णवाहिका, बचाव साहित्य, रबरी बोट, लाईफ जॅकेट, जीवरक्षक, सुरक्षा गार्ड, गाईड इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. वन व्यवस्थापन समितीमार्फत गड किल्ल्यावर जाणाऱ्या मार्गावर सुचनां फलक लावावेत. स्थानिक प्रशिक्षित गाईड उपलब्ध करावेत. उपविभागीय अधिकारी तहसिल कार्यालयाकडील लाईफ जॅकेटस् व लाईफ बोयाज, टॉर्च, रोप इ. साहित्य आपत्कालीन प्रसंगी स्वयंसेवकांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. नागरी संरक्षण दल व गृहरक्षक दलाकडील स्वयंसेवकांना जीवरक्षक म्हणून ठेवण्यात यावे. नगर पालिका/ग्रामपंचायती यांनी सुरक्षा जॅकेट, बोटी, पोहणाऱ्या व्यक्ती इ. संसाधने उपलब्ध ठेवावीत. इंडियन कोस्ट गार्ड विभागाने आवश्यक बोटी, लाईफ जॅकेट, डायव्हर्स इ. उपलब्ध करुन देण्यात यावेत, घटना घडल्यास समुद्र किनारी तात्काळ शोध व बचाव मोहिम हाती घ्यावी. नगर पालिका/ग्रामपंचायती यांनी पर्यटनस्थळी घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक कार्यवाहीकरावी. स्वच्छत्ता पथक स्थापित करावेत. पर्यटनस्थळी पार्किंगची पुरेशी व्यवस्था करावी. नगरपालिका/ग्रामपंचायतीने ध्वनीक्षेपकाव्दारे बीचवर पर्यटकांना स्वतःची काळजी घेणे, खोल समुद्रात न जाणे इ. सुचनां पर्यटकांना देण्यात याव्यात. बीचवरील अनधिकृत वॉटरस्पोर्टस, ए.टी.व्ही. वाहने, पॅरासेलिंग, विविध वॉटर राईडस् चालविणाऱ्या विरुध्द कारवाई करावी, नद्यांवर रिव्हर राफ्टींग, वॉटरस्पोर्टस उपक्रम चालविणाऱ्या संस्थांकडे पुरेसे तज्ञ मनुष्यबळ व सुरक्षेचे साहित्य उपलब्ध आहे अगर कसे याची तपासणी करावी. अनधिकृत उपक्रम चालविणाऱ्या संस्था/व्यक्ती यांच्यावर नियमोचित कारवाई करावी. पर्यटनस्थळावर मनोरंजनासाठी चालविण्यात येणाऱ्या विविध खेळ, उपक्रमांसाठी संबंधित संस्था/व्यक्ती यांनी शासनाकडून परवाना घेतला आहे अगर कसे? तसेच त्यांच्याकडे कुशल मनुष्यबळ व सुरक्षा साहित्य उपलब्ध आहे अगर कसे? याची सर्व संबंधित विभागप्रमुखांनी त्यांच्यास्तरावरुन तपासणी करावी. सर्व विभागांचे नियंत्रण कक्ष २४७ कार्यरत राहतील, याची दक्षता घ्यावी. कोणत्याही अपघाताप्रसंगी आपल्या विभागाकडून तात्काळ सक्षम प्रतिसाद मिळेल, अशी व्यवस्था करावी. कोणत्याही अपघाताची माहिती तत्काळ जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व नियंत्रण कक्षास सादर करावी. आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजनां स्थानिक स्वराज्य संस्थांनी कराव्यात, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पर्यटनस्थळांवरील पर्यटकांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेवून शोध व बचाव पथके साहित्यांसह तत्पर ठेवावेत, सुरक्षेच्या उपाययोजनां अभावी घटना घडल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी उपकरणे खरेदी केल्याचे प्रमाणपत्र सादर करावेत

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता रायगड(प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थतता, दुर्बल तेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. सहाय्यभूत आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत पात्र वृद्ध लाभार्थ्यांना लाभ दिला असून या योजनेंतर्गत विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक (Invoice) प्रमाणपत्र ३० दिवसांच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड कच्छिभवन, नमिनाथ जैन मंदिरा जवळ, श्रीबाग रोड, अलिबाग, कार्यालयात सादर करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण रायगड समाधान इंगळे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांचे जिल्ह्यात १९ हजार ४३७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ८ हजार ३०० लाभार्थ्यांना बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात थेट रु.३ हजार लाभ वितरण केला आहे.

## २० वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान झालेल्या काळ्या-पिवळ्या जीप टॅक्सीची नियमानुसार नोंदणी रद्द करणे आवश्यक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :** मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या निर्णयान्वये, २० वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान झालेल्या काळ्या-पिवळ्या जीप टॅक्सीची नियमानुसार नोंदणी रद्द करणे आवश्यक आहे. तथापि अशी वाहने प्रवासी वाहतुकीसाठी वापरली जातात. अशा वाहनांमुळे अपघात होऊन रस्त्यावरील इतर वाहने तसेच प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होतो. नोंदणी वैधता संपलेल्या वाहनांची तपासणी करण्यात येत असून ही वाहने जप्त करण्याची कार्यवाही परिवहन विभागामार्फत सुरु आहे. तरी २० वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान होऊन नोंदणी वैधता संपलेल्या वाहनांच्या परवानाधारकांनी काळ्या-पिवळ्या जीप टॅक्सी परवाना रद्द करून नवीन वाहन परवाना काढून घ्यावा. त्याचप्रमाणे काळ्या-पिवळ्या जीप टॅक्सीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी m-parivahan ॲपचा वापर करून वाहनाच्या नोंदणी क्रमांकानुसार वाहनांची नोंदणी वैधता / योग्यता प्रमाणपत्र वैधता संपलेली आढळून आल्यास अशा वाहनांतून प्रवास करू नये, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.आशुतोष बारकुल यांनी नागरिकांना केले आहे.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी